तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक :२/एनजीसी/२००३/ ७३२३
दिनांक : 22 ऑगस्ट 2003

प्रति,
प्राचार्य,
किसान ज्ञानोदय मंडळाचे
के.डी.एम.जी.यांचे इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी,
द्वारा आयुर्वेद महाविद्यालय,
चाळीसगांव,जळगांव.

विषय- शैक्षणिक वर्ष २००३-०४ साठी विना अनुदान तत्वावर डी.फार्मसी हा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भ:- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांकः मान्यता-२००३/ (प्र.क्र.१४९/०३) तांशि-२, दिनांक १९ जुलै २००३

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००३-२००४ साठी विना अनुदान तत्वावर खालील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | डिप्लोमा कोर्स इन फार्मसी | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे लागेल तसेच संस्थाचालक व संबंधित सहसंचालक यांच्या संयुक्त खात्यात शासन जी रक्कम विहित करतील ती भरावी लागेल.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००३-२००४ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१अ, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

3. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यांत यावे. शिक्षकवृंद व इतर

PRINCIPAL
K.D.M.G.'s Institute of Pharmac,
Chalisgaon



C:\My Documents\M.R.Jadhav\orders\Polytechnic Order 2003-2004.doc

कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थे
कडक कारवाई करण्यात येईल.

४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून रु.५.०० लाख भारतीय स्टेट ब
चाळीसगांव शाखा येथे पावती क्रं. टीडीओ/४५-९३१४५०, दि.१२/८/२००३ अन्वये ५ वर्षासाठी जमा केले
आहेत

५ आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्ष
मंडळ मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम आरक्षण शिक्षणशुल्क व इतर शुल्क
संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क शासन मंजूरीप्रमाणे आकारण्यात यावे.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके,नियतकालिके इ. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,मुंब
यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्या
दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई किंवा त्यांच्याकडून प्राधिकृ
करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-य
उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा, सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फि किंवा इतर कोणत्यांही
स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१२. शासनाने, या संचालनालयाने व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या
अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास
राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

( प्रा. न. बा. पासलकर )
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतः
१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नाशिक यांना माहितीस्तव सादर.
३. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ ,औरंगाबाद
५. श्री.अे.एम.जाधव, सिस्टिम ॲनालिस्ट, यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६. कार्यासन क्रमांक १० मुख्य कार्यालय,मुंबई.
७. निवड नस्ती.

PRINCIPAL
K.D.M.G.'s Institute of Pharmacy
Chalisgaon